वैद्यकीय शिक्षण व संशोधन, मुंबई यांच्या अधिपत्याखालील शासकीय वैद्यकीय/ दंत महाविद्यालयातील अध्यापकीय पदांबरोबरच रुग्णसेवेशी संबंधित गट-क व गट-ड मधील सरळसेवेच्या कोटयातील १०० टक्के पदे भरण्यास मान्यता देणे बाबत.

महाराष्ट्र शासन
वैद्यकीय शिक्षण व औषधी द्रव्ये विभाग
शासन निर्णय क्रमांक : संकीर्ण-१०२०/प्र.क्र.२१/२०२०/वैसेवा -१
गो.ते.रुग्णालय संकुल इमारत, ९ वा मजला,
लोकमान्य टिळक मार्ग, मुंबई - ४०० ००१.
दिनांक :- ११ जून २०२०

**प्रस्तावना :-**

शासकीय वैद्यकीय/ दंत/आयुर्वेद महाविद्यालयात विद्यार्थी शिक्षण तसेच जनतेला रुग्णसेवा उपलब्ध करुन देण्यात येतात. संबंधित शासकीय वैद्यकीय/ दंत महाविद्यालयाचे कामकाज हे अनुक्रमे भारतीय आयुर्विज्ञान परिषद, भारतीय दंत परिषद या नियंत्रक संस्थाच्या मानकानुसार मंजूर विद्यार्थी संख्या व त्याप्रमाणात वर्ग-१ ते वर्ग-४ या संवर्गात अध्यापक, तांत्रिक व अतांत्रिक संवर्ग यांची संख्या व त्याचे मानक उक्त नियंत्रक संस्थेद्वारे निश्चित केले जाते. यासाठी सर्व महाविद्यालयाचे ठराविक काळाने संबंधित संस्थाद्वारे निरिक्षण होत असून उपलब्ध पदांची संख्या मानकांपेक्षा कमी असल्याचे आढळून आल्यास मंजूर विद्यार्थी संख्येवर व काही प्रसंगी विद्यालयांच्या मान्यतेवर विपरित परिणाम होण्याची शक्यता नाकारता येत नाही. वैद्यकीय शिक्षण व संशोधन संचालनालयाच्या अधिनस्त एकूण १८ शासकीय वैद्यकीय महाविद्यालये तसेच अन्य नागरी संस्था येथील पदे रिक्त राहिल्याने वैद्यकीय सेवेशी निगडीत विद्यार्थ्यांचे शिक्षण व रुग्णसेवा यावर गुणात्मक विपरित परिणाम होत आहे.

हिवाळी अधिवेशनाच्या कालावधीत मा.मुख्यमंत्री महोदयांच्या अध्यक्षतेखाली दि. १९.१२.२०१९ रोजी झालेल्या बैठकीत, वैद्यकीय सेवा ही तातडीची बाब असल्याने वैद्यकीय शिक्षण विभागाला अत्यावश्यक सेवा म्हणून घोषित करण्यातबाबतचा प्रस्ताव सादर करावा असे मा. मुख्यमंत्री महोदयांनी निर्देश दिले आहेत.

ही वस्तुस्थिती विचारात घेवून वैद्यकीय शिक्षण व संशोधन, मुंबई यांच्या अधिपत्याखालील शासकीय वैद्यकीय/ दंत महाविद्यालयातील वर्ग-१ व वर्ग-२ मधील अध्यापकीय पदांबरोबरच रुग्णसेवेशी संबंधित वर्ग-३ व वर्ग-४ मधील सरळसेवेच्या कोटयातील १०० टक्के पदे भरण्यास मान्यता देणेची बाब शासनाच्या विचाराधीन होती. तद्नुषंगाने शासनाने आता खालीलप्रमाणे निर्णय घेतला आहे.

Scanned with CamScanner

शासन निर्णय :-

विषयांकीत प्रकरणी अप्पर मुख्य सचिव (सेवा) सामान्य प्रशासन विभाग व सचिव (व्यय) वित्त विभाग यांच्या उपसमितीच्या दिनांक २ मार्च २०२० रोजी झालेल्या बैठकीत मान्यता मिळाल्यानुसार वैद्यकीय शिक्षण व संशोधन संचालनालय, मुंबई यांच्या अधिनस्त शासकीय वैद्यकीय /दंत महाविद्यालय व आयुष संचालनालयाच्या अधिनस्त आयुर्वेद महाविद्यालय त्याचप्रमाणे संचालनालयाच्या स्तरावर सध्या मंजूर पदांनुसार सरळसेवेच्या कोट्यातील रिक्त पदांबाबत खालीलप्रमाणे मान्यता देण्यात येत आहे.

अ) वर्ग-१ / वर्ग-२/ वर्ग-३ मधील खाली नमूद केलेल्या संवर्गातील सरळसेवेच्या रिक्त असलेल्या पदांच्या १०० टक्के भरतीसाठी पदभरतीची मुभा देण्यात येत आहे.

| वर्ग | अनुक्रमांक | पदनाम |
|---|---|---|
| वर्ग-१ | १ | संचालक/सह संचालक (वैद्यकीय) |
| | २ | सह संचालक (दंत) |
| | ३ | संचालक (आयुष)/सह संचालक |
| | ४ | अधिष्ठाता (वैद्यकिय ) |
| | ५ | अधिष्ठाता (दंत ) |
| | ६ | वैद्यकिय अधिकारी(वर्ग-१ ) |
| | ७ | उप संचालक व इतर |
| | ८ | प्राध्यापक (वैद्य) |
| | ९ | प्राध्यापक (दंत) |
| | १० | प्राध्यापक (आयुष) |
| | ११ | सहयोगी प्राध्यापक (वैद्य) |
| | १२ | सहयोगी प्राध्यापक/(दंत) |
| | १३ | सहयोगी प्राध्यापक (आयुष) |
| वर्ग-२ | १४ | सहायक प्राध्यापक (वैद्य) |
| | १५ | सहाय्यक प्राध्यापक (दंत) |
| | १६ | सहाय्यक प्राध्यापक (आयुष) |
| | १७ | वैद्यकिय अधिकारी (गट-ब) (वैद्यकिय ) |
| | १८ | वैद्यकिय अधिकारी व इतर (आयुष) |
| | १९ | दंतशल्य चिकित्सक |

Scanned with CamScanner

| | | |
|---|---|---|
| | २० | अधिसेविका |
| | २१ | वैद्यकीय अधिकारी (आयुष) |
| वर्ग-३ | २२ | अधिपरिचारीका |

ब) वर्ग-३ व वर्ग-४ या संवर्गातील तांत्रिक/ रूग्णसेवेशी निगडीत सरळसेवेच्या कोटयातील रिक्त पदांपैकी ८५ टक्के पदे भरण्यास मुभा देण्यात येत आहे.

| वर्ग | अनुक्रमांक | पदनाम |
|---|---|---|
| वर्ग-३ | १ | वैद्यकिय ( तांत्रिक ) |
| | २ | पाठ्यनिर्देशिका |
| | ३ | आयुष ( तांत्रिक+ परिचारीका) |
| वर्ग-४ | ४ | कुशल पदे (वैद्यकीय ) |
| | ५ | कुशल पदे (आयुष ) |

क) प्रशासकीय कामकाजासाठी असलेल्या वर्ग-१ ते वर्ग-४ मधील सरळसेवेच्या खालील संवर्गातील एकूण रिक्त पदांपैकी ७५ टक्के पदे भरण्यास मुभां देण्यात यावी.

| वर्ग | अनुक्रमांक | पदनाम |
|---|---|---|
| वर्ग-१ | १ | मुख्य प्रशासकीय अधिकारी |
| | २ | मुख्य प्रशासकीय अधिकारी (आयुष) |
| वर्ग-२ | ३ | प्रशासकीय अधिकारी |
| | ४ | प्रशासकीय अधिकारी व इतर ( आयुष) |
| वर्ग-३ | ५ | कार्यालयीन अधिक्षक व लिपिक संवर्ग ( वैद्य ) |
| | ६ | कार्यालयीन अधिक्षक व लिपिक संवर्ग ( आयुष ) |
| वर्ग-४ | ७ | अकुशल पदे (वैद्य ) |
| | ८ | अकुशल पदे (आयुष ) |

ड) चतुर्थश्रेणीतील बहुउद्देशीय स्वरुपाच्या सेवा ३६३२ इतक्या मनुष्य बळाच्या मर्यादेत बाह्य यंत्रणेकडून उपलब्ध करुन घेण्यास मुभा देण्यात येत आहे.

Scanned with CamScanner

२.    वरीलप्रमाणे सरळसेवेच्या कोट्यातील रिक्त पदे विहीत सेवाप्रवेश नियमांनुसार प्राथम्याने भरण्याची कार्यवाही तात्काळ सुरु करण्यात यावी.

३.    सदर शासन निर्णय वित्त विभागाच्या दिनांक. २०.०५.२०२० अन्वये दिलेल्या सहमतीनुसार व शासनाच्या निर्गमित करण्यात येत आहे.

महाराष्ट्राचे राज्यपाल यांच्या आदेशानुसार व नांवाने,

(डॉ.संजय मुखर्जी)
सचिव, (वैद्यकीय शिक्षण व औषधी द्रव्ये विभाग),
महाराष्ट्र शासन

प्रति,

मा. राज्यपालांचे प्रधान सचिव, राजभवन, मुंबई
मा. मुख्यमंत्र्याचे प्रधान सचिव, मंत्रालय, मुंबई
मा. मंत्री (वै.शि.) यांचे खाजगी सचिव, मंत्रालय, मुंबई.
मा. राज्यमंत्री (वै.शि.) यांचे खाजगी सचिव, मंत्रालय, मुंबई,
मा.मुख्य सचिव, महाराष्ट्र राज्य,मंत्रालय,मुंबई.
अपर मुख्य सचिव (सेवा), सामान्य प्रशासन विभाग, मंत्रालय, मुंबई
प्रधान सचिव, (व्यय), वित्त विभाग, मंत्रालय, मुंबई
संचालक, वैद्यकीय शिक्षण व संशोधन, मुंबई.
संचालक, आयुष संचालनालय, मुंबई
अधिष्ठाता, सर्व शासकीय वैद्यकीय /दंत / आयुर्वेद महाविद्यालये,
सर्व सहसचिव / उप सचिव, वैद्यकीय शिक्षण व औषधी द्रव्ये विभाग, मंत्रालय, मुबई
महालेखापाल-१/२, (लेखा परीक्षा / लेखा व अनुज्ञेयता) महाराष्ट्र राज्य, मुंबई / नागपूर
अधिदान व लेखा अधिकारी, मुंबई / निवासी लेखा परीक्षा अधिकारी, मुंबई
निवडनस्ती (वैसेवा-१).

Scanned with CamScanner